जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५८ दिनांक - ३१/१०/२०२४**

वानवडी पोलिस स्टेशन पुणे शहर

## वानवडी पोलीस स्टेशन कडून नागरिकांचे गहाळ/हरवलेले रक्कम रू.६ लाख २५ हजारचे एकुण ४५ मोबाईल हस्तगत करून नागरीकांना परत.

वानवडी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये प्रवासा दरम्यान व विविध ठिकाणाहून मोबाईल हँडसेट गहाळ झाले बाबत वानवडी पोलीस स्टेशन येथे ऑनलाईन तक्रारी तसेच सी.ई.आर.आर.या पोर्टलवर तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.सदर गहाळ झालेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करुन हरवलेले मोबाईल वापरत असलेल्या लोकांना संपर्क करुन कि.रु.६,२५,०००/-चे एकूण ४५ मोबाईल फोन हस्तगत करण्यात यश आलेले आहे.हस्तगत करण्यात आलेले मोबाईल संबंधीत तक्रारदार यांना परत देण्यात आले आहेत.मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदार यांनी आनंद व्यक्त करुन पोलीसांचे आभार व्यक्त केले आहेत.

मोबाईल हरविल्यानंतर त्यांची तक्रार पुणे पोलीस वेबसाईट वरील लॉस्ट ॲण्ड फाऊंट वर तसेच शासनाचे CEIR या पोर्टवर तात्काळ नोंद करावी असे आवाहन पुणे पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त परि. ५,पुणे शहर श्री.आर.राजा मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर श्री.धन्यकुमार गोडसे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पतंगे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे) श्री.गोविंद जाधव, तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक संजय आदलिंग, पोलीस अमंलदार अतुल गायकवाड, अमोल पिलाणे, आनंद दरेकर, महेश गाढवे, दया शेगर, हरी कदम, सर्फराज देशमुख, संदिप साळवे, सोमा कांबळे, गोपाळ मदने, यतिन भोसले, विष्णू सुतार, अमोल गायकवाड, सुजाता फुलसुंदर यांनी केली आहे.


वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर


वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर